# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४००००१.

दूरध्वनी क्र. (०२२) २२६१७९६९ फॅक्स नं.(०२२)२२६९०००७

तार- EDUTECH E-mail mcm.dte@gmail.com Website :- http://www.dte.org.in/mcm

क्रमांक :- ३/असं/गुनिसाशि/२००८/०७

दिनांक :- ०६.११.२००८

प्रति,

संचालक/ प्राचार्य,
सर्व शासकीय, अनुदानित, विना अनुदानित
अभियांत्रिकी महाविद्यालये, औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये, वास्तुशास्त्र महाविद्यालये, एच.एम.सी.टी, व्यवस्थापनशास्त्र महाविद्यालये, एमसीए महाविद्यालये.

**विषयः- अल्पसंख्यांकाच्या गुणवत्ता-नि-साधन (Merit cum Means) शिष्यवृत्तीबाबत....**

केंद्र शासनाने मुस्लीम, सीख, बौध्द, ख्रिश्चन व पारशी या अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांकरिता गुणवत्ता-नि-साधन आधारित शिष्यवृत्ती (Merit-cum-Means Based Scholarship) योजना भारतभर सुरु केलेली आहे. ही योजना महाराष्ट्र राज्यात राबविण्याकरिता महाराष्ट्र शासनाने संचालक, तंत्रशिक्षण, यांची नोडल ऑफिसर म्हणून नियुक्ती केलेली आहे. सदर योजनेची सविस्तर माहिती, अर्जाचा नमुना, अर्ज करावयाची पध्दती, विद्यार्थ्यांची पात्रता, अभ्यासक्रमांची यादी व **संस्थेमार्फत** अर्ज सादर करावयाचे वेळापत्रक संचालनालयाच्या www.dte.org.in/mcm या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. याबाबतची जाहिरात वेळोवेळी वृत्तपत्रामधून देण्यांत आलेली आहे

शैक्षणिक वर्ष २००८-०९ करिता शिष्यवृत्ती नुतनीकरण व नवीन शिष्यवृत्तीकरिता पात्र विद्यार्थ्यांकडून संस्थेमार्फत अर्ज मागविण्यात आलेले आहेत. तरी विद्यार्थ्यांनी सदर योजनेचा लाभ घेण्याकरिता उपरोक्त संकेतस्थळाला भेट दयावी.

सदर शिष्यवृत्तीचा अर्ज संस्थेच्या प्राचार्यांमार्फत या कार्यालयाकडे पाठवावयाचा आहे. सदर अर्जाची छाननी करीत असताना आवश्यक ती प्रमाणपत्रे जोडलेली नसल्यास ती विद्यार्थ्यांकडून प्राप्त करुन घ्यावी. एखादा विद्यार्थी एखादे प्रमाणपत्र जोडण्यास असमर्थ असेल, तर सदरचा अर्ज अवैध न ठरविता विद्यार्थ्याकडून त्या प्रमाणपत्राबाबत हमीपत्र घेऊन या कार्यालयाकडे पाठविण्यांत यावा. कोणत्याही परिस्थितीमध्ये जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळवून द्यावा. तसेच सदर योजनेची माहिती दर्शनी भागावरील सूचना फलकावर लावण्यांत यावी.

**( डॉ. मु. का. महाजन )**
प्र. संचालक, तंत्रशिक्षण तथा
नोडल ऑफिसर